बँक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बँक

निगमित संप्रेषण व निवेशक संबंध
प्रधान कार्यालय लोकमंगल, शिवाजीनगर, पुणे-5
टेली क्र.020-25614495, 25614366,25514501 से 12 विस्तार 495

21-10-2021

# वृत्तपत्रीय निवेदन

# दिनांक 30 सप्टेंबर 2021 रोजी संपलेली तिमाही आणि अर्धवर्षाचे आर्थिक निकाल

## दृष्टिक्षेपात निकाल

30 सप्टेंबर 2021 रोजी संपलेली तिमाही आणि 30 सप्टेंबर 2020 रोजी संपलेली तिमाही यांची तुलना.

- एकूण व्यवसायात 13.27% वाढ होऊन तो रु. 2,96,808 कोटी इतका झाला.
- एकूण ठेवींमध्ये 14.47% वाढ होऊन त्या रु. 1,81,572 कोटी इतक्या झाल्या.
- CASA (चालू खाते / बचत खाते) यामध्ये 22.17% वाढ.
- एकूण कर्जे 11.44% वाढून ती 1,15,235 कोटी इतकी झाली.
- एकूण थकीत कर्जे दिनांक 30-9-2021 ला 5.56% पर्यंत कमी झाली.
- निव्वळ थकीत कर्जे दिनांक 30-9-2021 ला 1.73% पर्यंत कमी झाली.
- संरक्षक तरतूद गुणोत्तर (प्रोव्हिजन कव्हरेज रेशिओ) 92.98% पर्यंत सुधारला.
- निव्वळ नफा 102.71% वाढून रु. 264 कोटी इतका झाला.
- कार्यान्वयन नफा 40.22% वाढून रु. 1,061 कोटी इतका झाला.
- व्याजाचे निव्वळ उत्पन्न 33.84% वाढले जे रु. 1,500 कोटी झाले.
- व्याजाचे निव्वळ प्रमाण दिनांक 30-9-2021 रोजी 3.27% इतके सुधारले.
- खर्च व उत्पन्न यांचे गुणोत्तर 46.76% पर्यंत सुधारले.
- मालमत्तेवरील परतावा 0.53% इतका सुधारला.
- भांडवल पर्याप्तता गुणोत्तर (CRAR) 14.67% इतके सुधारले. त्यापैकी स्तर 1 भांडवल (टायर-1) 11.38% आहे.

## नफाक्षमता (30 सप्टेंबर 2021 रोजी संपलेली तिमाही)

निगमित संप्रेषण व निवेशक संबंध
प्रधान कार्यालय लोकमंगल, शिवाजीनगर, पुणे-5
टेली क्र.020-25614495, 25614366,25514501 से 12 विस्तार 495

- गतवर्षीच्या तुलनेत निव्वळ नफ्यात 102.71% वाढ होऊन तो आर्थिक वर्ष 22 च्या दुसऱ्या तिमाहीत रु. 264 कोटी झाला, जो आर्थिक वर्ष 21 च्या दुसऱ्या तिमाहीत रु. 130 कोटी होता. मागील तिमाहीच्या तुलनेत त्यात 26.76% वाढ झाली.
- गतवर्षीच्या तुलनेत कार्यान्वयन नफ्यामध्ये 40.22% वाढ झाली. आर्थिक वर्ष 22 च्या दुसऱ्या तिमाहीत कार्यान्वयन नफा रु. 1,061कोटी आहे जो आर्थिक वर्ष 21 च्या दुसऱ्या तिमाहीत रु. 756 कोटी होता.
- व्याजाच्या निव्वळ उत्पन्नात गतवर्षीच्या तुलनेत 33.84% वाढ झाली. आर्थिक वर्ष 22 च्या दुसऱ्या तिमाहीत व्याजाचे निव्वळ उत्पन्न रु. 1,500 कोटी आहे, जे आर्थिक वर्ष 21 च्या दुसऱ्या तिमाहीत रु. 1,120 कोटी होते. मागील तिमाहीच्या तुलनेत त्यात 6.66% वाढ झाली.
- एकूण उत्पन्न (व्याजाचे निव्वळ उत्पन्न अधिक इतर उत्पन्न) आर्थिक वर्ष 22 च्या दुसऱ्या तिमाहीत आर्थिक वर्ष 21 च्या दुसऱ्या तिमाहीच्या रु. 1,522 कोटीच्या तुलनेत 30.88% वाढून ते रु. 1,992 कोटी झाले.
- शुल्क आधारित उत्पन्नामध्ये गतवर्षीच्या तुलनेत 10.97% वाढ झाली. आर्थिक वर्ष 22 च्या दुसऱ्या तिमाहीमध्ये ते रु. 303 कोटी इतके झाले आहे.
- व्याजाव्यतिरिक्त उत्पन्नामध्ये गतवर्षीच्या तुलनेत 22.61% वाढ झाली. आर्थिक वर्ष 22 च्या दुसऱ्या तिमाहीत ते रु. 493 कोटी इतके आहे.
- खर्च व उत्पन्न गुणोत्तरात गतवर्षीच्या दुसऱ्या तिमाहीच्या 50.31% च्या तुलनेत आर्थिक वर्ष 22 च्या दुसऱ्या तिमाहीत 46.76% इतकी सुधारणा झाली. 30-6-2021 रोजी संपलेल्या तिमाहीत ते 48.33% इतके होते.
- मालमत्तेवरील परताव्यामध्ये सुधारणा झाली. परताव्याचे प्रमाण आर्थिक वर्ष 22 च्या दुसऱ्या तिमाहीमध्ये 0.53%, आर्थिक वर्ष 21 च्या दुसऱ्या तिमाहीमध्ये 0.28% आणि आर्थिक वर्ष 22 च्या पहिल्या तिमाहीत 0.41% होते.

निगमित संप्रेषण व निवेशक संबंध
प्रधान कार्यालय लोकमंगल, शिवाजीनगर, पुणे-5
टेली क्र.020-25614495, 25614366,25514501 से 12 विस्तार 495

- भांडवलावरील परताव्यामध्ये देखील सुधारणा झाली. परताव्याचे प्रमाण आर्थिक वर्ष 22 च्या दुसऱ्या तिमाहीत 11.98%, आर्थिक वर्ष 21 च्या दुसऱ्या तिमाहीत 7.64% आणि आर्थिक वर्ष 22 च्या पहिल्या तिमाहीत 9.91% होते.

## नफाक्षमता (30 सप्टेंबर 2021 रोजी संपलेले अर्ध वर्ष)

- गतवर्षीच्या तुलनेत निव्वळ नफ्यामध्ये 104.11% वाढ. आर्थिक वर्ष 22 च्या अर्धवर्षात रु. 472 कोटी निव्वळ नफा, जो आर्थिक वर्ष 21 च्या अर्धवर्षात रु. 231 कोटी होता.
- कार्यान्वयन नफ्यामध्ये गतवर्षीच्या तुलनेत 47.85% वाढ. आर्थिक वर्ष 22 च्या अर्धवर्षात कार्यान्वयन नफा 2,115 कोटी होता जो आर्थिक वर्ष 21 च्या अर्धवर्षात 1,431 कोटी होता.
- व्याजाच्या निव्वळ उत्पन्नात गतवर्षीच्या तुलनेत 31.57% वाढ. आर्थिक वर्ष 22 च्या अर्धवर्षात हे उत्पन्न 2,905 कोटी आहे जे आर्थिक वर्ष 21 च्या अर्धवर्षात रु. 2,208 कोटी होते.
- एकूण उत्पन्न (व्याजाचे निव्वळ उत्पन्न अधिक इतर उत्पन्न) 37% वाढले. आर्थिक वर्ष 22 च्या अर्धवर्षात ते रु. 4,034 कोटी झाले, जे आर्थिक वर्ष 21 च्या अर्धवर्षात रु. 2,943 कोटी झाले.
- शुल्क आधारित उत्पन्नात गतवर्षीच्या तुलनेत 30.52% वाढ होऊन आर्थिक वर्ष 22 च्या अर्धवर्षात ते रु. 556 कोटी झाले.
- व्याजाव्यतिरीक्त उत्पन्नामध्ये गतवर्षीच्या तुलनेत 53.54% वाढ होऊन आर्थिक वर्ष 22 च्या अर्धवर्षात ते रु. 1,128 कोटी झाले.
- खर्च व उत्पन्न गणोत्तरात सुधारणा - आर्थिक वर्ष 22 च्या अर्धवर्षात 47.56% जे आर्थिक वर्ष 21 च्या अर्धवर्षात 51.39% होते.
- मालमत्तेवरील परताव्यामध्ये सुधारणा. आर्थिक वर्ष 22 च्या अर्धवर्षात 0.47% जो आर्थिक वर्ष 21 च्या अर्धवर्षात 0.25% होता.

निगमित संप्रेषण व निवेशक संबंध
प्रधान कार्यालय लोकमंगल, शिवाजीनगर, पुणे-5
टेली क्र.020-25614495, 25614366,25514501 से 12 विस्तार 495

- भांडवलावरील परताव्यामधेदेखील सुधारणा. आर्थिक वर्ष 22 च्या अर्धवर्षात 10.92% जो आर्थिक वर्ष 21 च्या अर्धवर्षात 6.93% होता.

## येणी व देणी

- एकूण व्यवसायामध्ये गतवर्षीच्या दुसऱ्या तिमाहीच्या तुलनेत आर्थिक वर्ष 22 च्या दुसऱ्या तिमाहीत 13.27% वाढ होऊन तो रु. 2,96,808 कोटी इतका झाला. मागील तिमाहीच्या तुलनेत त्यात 4.15% वाढ झाली.
- एकूण ठेवींमध्ये गतवर्षीच्या दुसऱ्या तिमाहीच्या तुलनेत आर्थिक वर्ष 22 च्या दुसऱ्या तिमाहीत 14.47% वाढ होऊन त्या रु. 1,81,572 कोटी इतक्या झाल्या.
- एकूण कर्जांमधे गतवर्षीच्या तुलनेत 11.44% वाढ झाली. आर्थिक वर्ष 22 च्या दुसऱ्या तिमाहीत ती. रु. 1,15,236 कोटी आहेत जी आर्थिक वर्ष 21 च्या दुसऱ्या तिमाहीत रु. 1,03,408 कोटी होती.
- निव्वळ कर्जे गतवर्षीच्या दुसऱ्या तिमाहीच्या तुलनेत 13.55% वाढून आर्थिक वर्ष 22 च्या दुसऱ्या तिमाहीत ती रु. 1,10,728 कोटी आहेत.
- RAM (Retail, Agri & MSME) किरकोळ, कृषि आणि लघुउद्योगांशी संबंधित व्यवसाय गतवर्षीच्या तुलनेत 14% वाढला. किरकोळ कर्जांमध्ये गतवर्षीच्या तुलनेत 14.47% वाढ होऊन ती रु. 30,480 कोटी इतकी झाली. सूक्ष्म व लघुउद्योगांच्या कर्जात गतवर्षीच्या तुलनेत 20.66% वाढ होऊन आर्थिक वर्ष 22 च्या दुसऱ्या तिमाहीत ती रु. 22,995 कोटी झाली.

## भांडवल पर्याप्तता

- आर्थिक वर्ष 22 च्या दुसऱ्या तिमाहीसाठी एकूण बेसेल 3 भांडवल पर्याप्तता गुणोत्तर 14.67% इतके सुधारले त्यात सर्वसाधारण स्तर 1 भांडवल प्रमाण 11.38% आहे.
- तरलता तरतूद गुणोत्तर 201.55% आहे जे नियामकांच्या 100% आवश्यकतेपेक्षा पुष्कळ जास्त आहे.

निगमित संप्रेषण व निवेशक संबंध
प्रधान कार्यालय लोकमंगल, शिवाजीनगर, पुणे-5
टेली क्र.020-25614495, 25614366,25514501 से 12 विस्तार 495

- बँकेने दि. 17 जुलै 2021 रोजी 403.70 कोटी रुपयांचे साधारण समभाग पारित केले आहेत.

## संपत्ती गुणवत्ता

- एकूण थकित कर्जांचे प्रमाण दिनांक 30-9-2021 रोजी 5.56% इतके कमी झाले, जे दिनांक 30-9-2020 रोजी 8.81% आणि दिनांक 30-6-2021 रोजी 6.35% होते.
- निव्वळ थकित कर्जांचे प्रमाण दिनांक 30-9-2021 रोजी 1.73% इतके झाले, जे दिनांक 30-9-2020 रोजी 3.30% आणि दिनांक 30-6-2021 रोजी 2.22% इतके होते.
- संरक्षक तरतूद गुणोत्तर (प्रोव्हिजन कव्हरेज रेशो) दिनांक 30-9-2021 साठी 92.38% इतका सुधारला. दिनांक 30-9-2020 रोजी ते 87.15% आणि 30-6-2021 रोजी 90.70% होते.
- दिनांक 30 सप्टेंबर 2021 रोजी बँकेकडे एकूण रु. 973 कोटी इतकी कोव्हिड-19 तरतूद आहे.

**नफा क्षमता** (रु. कोटी)

| तपशील | समाप्त तिमाही | | | बदल (%) | |
|---|---|---|---|---|---|
| | सप्टेंबर 20 | जून 21 | सप्टेंबर 21 | तिमाही ते तिमाही | वर्ष ते वर्ष |
| एकूण उत्पन्न | 3,270 | 3,739 | 3,700 | 0.13 | (0.01) |
| एकूण खर्च | 2,513 | 2,684 | 2,639 | 0.05 | (0.02) |
| कार्यान्वयन नफा | 756 | 1,055 | 1,061 | 0.40 | 0.01 |
| तरतुदी व आकस्मिकता (कर वगळून) | 372 | 595 | 516 | 0.39 | (0.13) |
| करपूर्व नफा | 385 | 460 | 545 | 0.42 | 0.19 |
| कर खर्च | 255 | 252 | 281 | 0.10 | 0.12 |
| निव्वळ नफा | 130 | 208 | 264 | 1.03 | 0.27 |

निगमित संप्रेषण व निवेशक संबंध
प्रधान कार्यालय लोकमंगल, शिवाजीनगर, पुणे-5
टेली क्र.020-25614495, 25614366,25514501 से 12 विस्तार 495

**शीर्ष व्यवसाय** (रु. कोटी)

| तपशील | रोजी | | वृद्धी % |
|---|---|---|---|
| | सप्टेंबर २० | सप्टेंबर २१ | वर्ष ते वर्ष |
| एकूण व्यवसाय | 22,62,034 | 2,96,808 | 13.27 |
| ठेवी | 1,58,626 | 1,81,572 | 14.47 |
| त्यापैकी CASA | 80,125 | 97,889 | 22.17 |
| एकूण ठेवींमध्ये CASA ठेवींचे प्रमाण% | 51 | 54 | |
| एकूण कर्जे | 1,03,408 | 1,15,236 | 11.44 |

**ताळेबंद**
**दायित्वे** (रु. कोटी)

| तपशील | रोजी | |
|---|---|---|
| | सप्टेंबर २० | सप्टेंबर २१ |
| भांडवल | 6,560 | 6,731 |
| गंगाजळी | 5,257 | 6,278 |
| ठेवी | 1,58,626 | 1,81,572 |
| कर्जे | 5,288 | 7,873 |
| अन्य दायित्वे व तरतुदी | 3,980 | 5,668 |
| एकूण | 1,79,711 | 2,08,122 |

**मालमत्ता**

| तपशील | रोजी | |
|---|---|---|
| | सप्टेंबर २० | सप्टेंबर २१ |
| भारतीय रिझर्व्ह बँकेकडील रोख व ठेवी | 5,438 | 13,838 |
| इतर बँकांकडील ठेवी व अल्प सूचनेवरील रक्कम | 80 | 53 |
| गुंतवणूकी | 63,040 | 71,774 |
| कर्जे निव्वळ | 97,511 | 1,10,728 |
| स्थिर मालमत्ता | 1,691 | 1,621 |
| इतर मालमत्ता | 11,950 | 10,107 |
| एकूण | 1,79,711 | 2,08,122 |

**गुंकवणूकदारांसाठी सादरीकरण बँकेच्या www.bankofmaharashtra.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.**

***